## L. A. BILL No. XXIX OF 2023.

A BILL
FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA
CO-OPERATIVE SOCIETIES ACT, 1960.

## सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९.

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

(शा.म.मु.) एचबी १०२६–१ (१०४६–७-२०२३)

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक १० जुलै २०२३ रोजी, महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०२३, हा प्रख्यापित केला होता ; १९६१ चा महा. २४. २०२३ चा महा. अध्या. ५.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १० जुलै २०२३ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ७३ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ७३ मध्ये, पोट-कलम (१अ) मधील, खंड (अ) मध्ये, " तिची नोंदणी झाल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत " या मजकुराऐवजी, " तिची नोंदणी झाल्याच्या किंवा, यथास्थिति, पुनर्रचना केल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत " हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९६१ चा महा. २४.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम १०१ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम १०१ मध्ये , पोट-कलम (१) मधील, " वैयक्तिक " हा मजकूर वगळण्यात येईल.

सन २०२३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ याचे निरसन व व्यावृत्ती.

**४.** (१) महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०२३ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. २०२३ चा महा. अध्या. ५.

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही (काढलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिती, काढलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (१९६१ चा महा. २४) याच्या कलम १९ मध्ये, एखाद्या संस्थेच्या विशेष सर्वसाधारण सभेत, संस्थेची पुनर्रचना करण्याचा प्रस्ताव मान्य करण्यात आल्यानंतर, निबंधकाकडे अर्ज केल्यावर अशा संस्थेची पुनर्रचना करण्याची तरतूद आहे. उक्त अधिनियमाच्या कलम ७३ मधील पोट-कलम (१अ) च्या खंड (अ) मध्ये, नव्याने नोंदणी केलेल्या संस्थेच्या समितीच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची कर्तव्ये पार पाडण्यासाठी तात्पुरती समिती नेमण्याची तरतूद आहे. तथापि, पुनर्रचना केलेल्या संस्थेची तात्पुरती समिती नेमण्यासाठी उक्त अधिनियमामध्ये उपरोक्त कोणतीही तत्सम तरतूद केलेली नव्हती.

म्हणून, पुनर्रचना केलेल्या संस्थेच्या बाबतीत तात्पुरती समिती नेमण्यासाठी तरतूद करण्याकरिता उक्त अधिनियमाच्या कलम ७३ च्या पोट-कलम (१अ) च्या खंड (अ) मध्ये सुयोग्य सुधारणा करणे इष्ट वाटले.

२. उक्त अधिनियमाच्या कलम १०१ चे पोट-कलम (१) हे, इतर गोष्टींबरोबरच, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने, केवळ तिच्या वैयक्तिक सदस्यांना दिलेल्या आगाऊ रकमांची वसुली करण्याचे अधिकार प्रदान करते. म्हणून, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने तिच्या संस्था सदस्यांना दिलेल्या आगाऊ रकमांची वसुली करणे देखील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस शक्य व्हावे या दृष्टीने, उक्त अधिनियमाच्या कलम १०१ च्या पोट-कलम (१) मध्ये सुयोग्य सुधारणा करणे इष्ट वाटले.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, म्हणून, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी दिनांक १० जुलै २०२३ रोजी, महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०२३, हा प्रख्यापित केला होता.

४. उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक २१ जुलै, २०२३.

**दिलीप वळसे-पाटील,**
सहकार मंत्री.

## सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९.—महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२३ याचे परिशिष्ट

### (महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यातील उतारे)

### (सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४)

**१.** ते **७२अ.** ** ** ** **

**७३.** (१) ** ** ** ** समिती, तिचे अधिकार व कार्य.

(१अब) ** ** ** **

[(१अ) हा अधिनियम, त्याखाली केलेले नियम किंवा कोणत्याही संस्थेचे अथवा संस्थांच्या वर्गाचे उपविधि यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(क) तात्पुरती समिती नेमण्यासाठी आणि विहित करण्यात येईल असे इतर कामकाज चालविण्यासाठी संस्थेची पहिली सर्वसाधारण बैठक तिची नोंदणी झाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत बोलावण्यात येईल. अशा तात्पुरत्या समितीच्या सदस्यांची मुदत, ती समिती प्रथम नियुक्त करण्यात आल्याच्या दिनांकापासून एक वर्षाचा कालावधी किंवा या अधिनियमाखाली केलेले नियम किंवा उपविधि यांच्या तरतुदीनुसार रीतसर समितीची यथोचितरित्या रचना करण्यात येईल त्या दिनांकापर्यंतच्या कालावधी यांपैकी जो अगोदर असेल त्या कालावधी इतकी असेल आणि अशा तात्पुरत्या समितीचे सर्व सदस्य, असा कालावधी समाप्त झाल्याच्या किंवा समितीची अशा रचना झाल्याच्या दिनांकास आपला पदभार सोडतील.

(ख) खंड (अ) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, सहकारी साखर कारखाने व सहकारी सूत गिरण्या आणि राज्य शासन, **राजपत्रातील**, विशेष किंवा सर्वसाधारण आदेशाद्वारे, याबाबत विनिर्दिष्ट करील असा इतर संस्थावर्ग यांकरिता तात्पुरत्या समित्या राज्य शासनाकडून नियुक्त करण्यात येतील, आणि त्यांचे सदस्य, तीन वर्षाकरिता पद धारण करतील हा कालावधी एका वेळी एका वर्षाने वाढविता येईल, मात्र एकूण कालावधी एकत्रितपणे पाच वर्षापेक्षा अधिक होणार नाही:

परंतु, राज्य शासनाला, अशा समितीवर नामनिर्देशित केलेला किंवा केलेले सदस्य ज्या कालावधीसाठी नामनिर्देशित करण्यात आला असेल/आले असतील तो कालावधी समाप्त झाला नसला तरी अशी समिती किंवा त्यातील कोणताही किंवा सर्व सदस्य यांमध्ये बदल करण्याचा किंवा तिची पुनर्रचना करण्याचा अधिकार असेल:

परंतु, आणखी असे की, समितीमधील अशा बदलानंतर किंवा पुनर्रचनेनंतर पदभार ग्रहण करणारा किंवा करणारे सदस्य या खंडाअन्वये ज्यासाठी तात्पुरती समिती नियुक्त करण्यात आलेली असेल, त्या कालावधीकरिता पदभार धारण करील/करतील.

(क) ** ** ** **

**७३-एक-ड.** ते **७३-आय.** ** ** **

**७४.** ते **१००.** ** ** ** **

**१०१.** [४][(१) कलमे ९१, ९३ आणि ९८ यात काहीही अंतर्भूत असले तरी, मुंबई कर्जदार शेतकरी सहाय्य अधिनियम, १९४७ यात व्याख्या केल्याप्रमाणे पिकांसाठी वित्त व्यवस्था व हंगामी वित्त व्यवस्था करण्याचे काम हाती घेतलेल्या [किंवा अठरा महिन्यांपेक्षा कमी नसेल आणि आणि पाच वर्षांपेक्षा अधिक नसेल, अशा मुदतीमध्ये परतफेड करण्याजोगी शेतीच्या इतर प्रयोजनांसाठी कर्ज देणाऱ्या] साधन संस्थेने आपल्या सदस्यांना पिकांसाठी केलेली वित्त व्यवस्था किंवा हंगामी वित्त व्यवस्था यासाठी [६][किंवा पूर्वोक्तप्रमाणे शेतीच्या इतर प्रयोजनासाठी] आगाऊ दिलेल्या कोणत्याही रकमेच्या थकबाकीच्या वसुलीसाठी अर्ज केल्यावर किंवा पीक संरक्षण संस्थेने आपल्या

विवक्षित संस्थांनी देय असलेल्या विवक्षित रकमा आणि थकबाकी जमीन महसुलाच्या थकबाकी प्रमाणे वसूल करणे.

सदस्यांकडून किंवा (ज्यांनी सदस्य होण्यास नकार दिला असेल अशा) प्रस्तावात समाविष्ट असलेल्या जमीनीच्या मालकाकडून देय असेल अशा प्रारंभिक खर्चाच्या किंवा पीक संरक्षणासाठी आवश्यक असलेल्या सेवा मिळविण्यासाठीच्या कोणत्याही अंशदानाच्या वसुलीसाठी अर्ज केल्यावर किंवा उद्धरण सिंचन सहकारी संस्थेने आपल्या सदस्यांकडून त्यांना पाणी पुरविण्यासाठी आवश्यक असलेल्या सेवा त्यांनी मिळविल्याबद्दल देय असलेल्या कोणत्याही वर्गणीच्या थकबाकीच्या वसुलीसाठी अर्ज केल्यावर, [९][किंवा तालुका किंवा गटपातळीवरील कारागीरांना कर्ज देणाऱ्या किंवा त्यांच्यासाठी रोख पत-पुरवठ्याची सोय करणाऱ्या ग्रामीण कारागीर बहुउद्देशीय संस्थेने आपल्या येणे रकमांच्या थकबाकीच्या वसुलीसाठी] [किंवा कर्जे देणाऱ्या एखाद्या सहकारी दुग्ध व्यवसाय संस्थेने तिच्या कोणत्याही सदस्याला दिलेल्या रकमेच्या थकबाकीच्या वसुलीसाठी किंवा एखाद्या नागरी सहकारी बँकेने तिच्या येणे रकमांच्या थकबाकीच्या वसुलीसाठी किंवा एखाद्या वेतनधारीच्या सहकारी संस्थेने तिच्या येणे रकमांच्या थकबाकीच्या वसुलीसाठी किंवा एखाद्या सहकारी मत्स्यव्यवसाय संस्थेने तिच्या येणे रकमांच्या वसुलीसाठी [१०][किंवा, राज्य शासन, वेळोवेळी **राजपत्रात** अधिसूचित करील अशा कोणत्याही संस्थेने किंवा संस्थावर्गाने अशाप्रकारे अधिसूचित केलेल्या संस्थेच्या किंवा संस्थावर्गाच्या सदस्यांना दिलेल्या कोणत्याही आगाऊ रकमेच्या किंवा त्यांच्याकडून येणे असलेल्या कोणत्याही वर्गणीच्या किंवा अन्य कोणत्याही रकमेच्या वसुलीसाठी] अर्ज केल्यावर] आणि संबंधित सहकारी संस्थेने थकबाकीच्या संबंधातील लेख्यांचे विचारण पत्र सादर केल्यावर [११][निबंधकास, विहित करण्यात येईल अशा रीतीने चौकशी केल्यानंतर, थकबाकी म्हणून देय असलेली रक्कम प्रमाणपत्रात नमूद करून त्या रकमेच्या वसुलीसाठी एक प्रमाणपत्र देता येईल. असे प्रमाणपत्र प्राप्त करण्याकरिता करावयाचा अर्ज विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशी कार्यपद्धती अनुसरण करण्यात येईल आणि अशा अर्जासोबत विहित करण्यात येईल अशी फी व दस्तऐवज जोडण्यात येतील.]

[१२][**स्पष्टीकरण-एक.—**या पोटकलमाच्या प्रयोजनासाठी "इतर शेतकी" प्रयोजने या शब्दप्रयोगामध्ये दुग्धव्यवसाय, मत्स्यसंवर्धन व कुक्कुटपालन यांचा समावेश होतो. ]

(२) ते (४) ** ** ** **

**१०२.** ते **१६८.** ** ** ** **

# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**[ सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९. ]**

**[ महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. दिलीप वळसे-पाटील,**
सहकार मंत्री.]

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई